**शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून राज्यात व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरू करण्यास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः टीईएम -२०१४/प्र.क्र.१७७/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२
तारीख: १५ जुलै, २०१४

वाचा :-

१) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/ एनजीसी/ मान्यता/२०१४/७५६, दिनांक ०९.०७.२०१४
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.सीटीसी-२०११/(२५१/ २०११)/तांशि - ४, दि. ०९.०८.२०११
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. टीईएम-२०११/सी. आर. न. १६२/ तांशि -४, दि. ३०.०६.२०११
४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. टीईएम-२०१०/ (१६५/१०)/ तांशि-४, दि. २६.०७.२०१०
५) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. टिईएम-२०११/ प्र.क्र.१६२/तांशि-४, दिनांक ३० जून, २०११

प्रस्तावना :-

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात खाजगी विना अनुदानित औषधनिर्माणशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र या पदवी / पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी राज्यात खाजगी विना अनुदानित औषधनिर्माणशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र या पदवी / पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या खालील संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये Letter of Approval दिले आहे.

| अनु क्र. | डी.टी.ई. कोड | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|---|
| १ | ४२७८ | महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, चौघन फाटा, अंबोरी रोड, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर | बी. फार्मसी | ६० |
| २ | ६७६५ | वेदांत इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अँड स्टडीज, वाघोली, पुणे | एमबीए | १२० |
| ३ | ५३९८ | अशोका बिझनेस स्कूल, उर्जयंत प्लाझा, सुमन पेट्रोल पंपाच्यापुढे, मुंबई-आग्रा हायवे, नाशिक ४२२ ००९. | एमबीए | १२० (पूर्वीची मंजूर क्षमता ६०) |
| ४. | २५१४ | ओयीस्टर इंन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, औरंगाबाद | बी.फार्मसी | १२० |

२. वरील संस्थांची अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेमार्फत थेट तपासणी होऊन सोयी सुविधांच्या कमतरता विचारात घेऊन त्यांची मान्यता परिषदेने नाकारली होती. संबंधित संस्थांनी परिषदेने उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता केल्यामुळे परिषदेने त्यांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता मान्यता प्रदान केलेली आहे. परिषदेने दिलेली मान्यता विचारात घेऊन सदर संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता वर नमूद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि

औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य विद्यापीठ अधिनियम,१९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

५) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

७) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट,१९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

९) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१०) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

११) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

१२) याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१३) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

१४) अ.क्र. ३ वरील अशोका बिझनेस स्कूल, नाशिक या संस्थेला एमबीए अभ्यासक्रमाची यापूर्वीची मान्यता ६० प्रवेशक्षमतेची होती. आता आणखी ६० प्रवेशक्षमता वाढवून ती १२० करण्यात आली आहे. वाढीव ६० प्रवेशक्षमतेला बृहत आराखडा लागू होतो. त्यामुळे प्रचलित धोरणानुसार या वाढीव ६० प्रवेशक्षमतेला शासनाची फी प्रतिपूर्तीची योजना लागू राहणार नाही, या अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. त्याकरीता संचालक, तंत्र शिक्षण यांनी सदर संस्थेकडून तशा आशयाचे नोटराईज शपथपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्यानंतरच पुढील आवश्यक ती कार्यवाही संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी. तथापि, वरील वाचा येथील शासन निर्णयान्वये वरील सर्व संस्थांच्या पूर्वीच्या मंजूर प्रवेशक्षमतेस फी प्रतिपूर्तीची योजना लागू राहील.

१५) ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०७१५१६१५५०१००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher & Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Madan Maruti Morve
Date: 2014.08.02 12:14:47 +05'30'

**(म. मा. मोरवे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे/नाशिक/औरंगाबाद/ नागपूर (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३. संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.

८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.

९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई

१०.निवड नस्ती/तांशि-४